पुढारी

# विद्यापीठात सोमवारी एकदिवसीय कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू लोकविद्या व लोकसंस्कृती अभ्यास केंद्राच्या वतीने दि. १२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता वि. स. खांडेकर भाषाभवन येथे 'लोकविद्या व लोकसंस्कृती : अभ्यास आणि संवर्धन' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील असतील. चर्चासत्रामध्ये डॉ. मुकुंद कुळे (मुंबई) व डॉ. नीला जोशी (कागल) हे मार्गदर्शन करणार आहेत. सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालयातील समन्वयक कार्यशाळेत सहभागी होणार आहेत. कार्यशाळेत सहभागी होण्याचे आवाहन अभ्यास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात सोमवारी कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू लोकविद्या आणि लोकसंस्कृती अभ्यास केंद्रातर्फे सोमवार, दि. १२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता वि. स. खांडेकर भाषाभवन येथे 'लोकविद्या आणि लोकसंस्कृती : अभ्यास आणि संवर्धन' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सांगली, सातारा आणि कोल्हापूर या तीन जिल्ह्यांतील महाविद्यालयांतील समन्वयक या कार्यशाळेत सहभागी होणार आहेत. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील असतील. चर्चासत्रामध्ये डॉ. मुकुंद कुळे, मुंबई व डॉ. नीला जोशी, कागल मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
10 DEC 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाश्वत विकास काळाची गरज

## प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शाश्वत विकास ही काळाची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी शाश्वत विकास म्हणजे काय, हे त्यांच्या कार्यातून दाखवून दिले आहे. विद्यार्थ्यांनी भरीव संशोधन करावे, संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठ सदैव पाठीशी आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी छत्रपती शाहू सभागृहामध्ये आयोजित आविष्कार संशोधन स्पर्धेमधील विजेत्यांचा सत्कार समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठामध्ये दि. ७ व ८ डिसेंबर रोजी विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेचे आयोजन राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृह येथे करण्यात आले होते. आविष्कार २०२२-२३ स्पर्धेचे आयोजन स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागाने केले होते, तर संयोजक विद्यार्थी विकास विभाग हे होते.

स्पर्धेमध्ये मानव्यविद्या, भाषा व ललितकला, वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा, मूलभूत विज्ञान, कृषी व पशुपालन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान आणि वैद्यकीय व औषध निर्माण या विविध शाखांतर्गत विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

प्रास्ताविक प्रा. किरणकुमार शर्मा यांनी केले, तर स्वागत डॉ. पी. टी. गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. किरण पवार यांनी केले. आभार डॉ. प्रमोद पाटील यांनी मानले.

# सकाळ




**कोल्हापूर : सायबरमध्ये विद्यापीठ परीक्षेसंबंधी कार्यशाळेत मार्गदर्शन करताना गजानन पळसे व मान्यवर.**

# 'सायबर'मध्ये परीक्षेबाबत कार्यशाळा

**कोल्हापूर, ता. ९ :** सायबर महिला महाविद्यालयात विद्यापीठ परीक्षेसंबंधित कार्यशाळा झाली. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते शिवाजी विद्यापीठ परी क्षा विभागाचे उपकुलसचिव गजानन पळसे होते. प्रारंभी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी उद्‌घाटन केले.

पळसे यांनी परी क्षे पूर्वी तयारी, परीक्षेदरम्यान कामकाज, उत्तर परीक्षा, नोंदी, हिशेब, प्रमादबाबत मार्गदर्शन केले. प्राचार्य प्रा. डॉ. व्ही. एस. ढेकळे, सायब र संस्थेचे सचिव व मॅनेजिंग ट्रस्टी डॉ. आर.ए. शिंदे यांचे सहकार्य लाभले. प्रास्ताविक व स्वागत परीक्षा विभाग प्रमुख प्रा. अर्चना पाटील यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रा. शामल पवार यांनी केले. आभार प्रा. अश्विनी रायबागकर यांनी मानले. आयक्युएसी व परीक्षा विभागाने आयोजन केले.

१० DEC 2022 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहू कॉलेजमध्ये जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव यशस्वी

कोल्हापूर, ता. ९ : राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव झाला. शिवाजी विद्यापीठामार्फत घेतलेल्या स्पर्धेत ७० महाविद्यालयांमधील पदवी स्तरावरील १८९ विद्यार्थी संशोधक सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी स्पर्धेसाठी संशोधन लेख, पोस्टर, पी.पी.टी., मॉडेल्स सादर केले. विद्यापीठाने संशोधन प्रकारानुसार १८ परीक्षक नेमले होते. स्पर्धेनंतर पारितोषिक वितरण झाले. प्राचार्य डॉ. एल. डी. कदम अध्यक्षपदी तर विज्ञान व तंत्रज्ञान विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एच. ठकार, डॉ. एस. बी. साधळे, रयत शिक्षण संस्थेच्या दक्षिण विभागप्रमुख मोहिते उपस्थित होते.

स्पर्धेत सहा इव्हेंट होते. त्यात ह्युमॅनिटीज, लँग्वेज आणि फाईन आर्टस्‌मधून विवेकानंद महाविद्यालयाची श्रेया मांडेकर (प्रथम), शोभा वाघमोडे (द्वितीय), राजाराम कॉलेजची दिव्या जगदाळे (तृतीय), मेडिसिन आणि फार्मसीमधून आनंदी फार्मसी कॉलेज, कळंबेतील सौजन्या कदम (प्रथम), शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागातील जान्हवी नाईक (द्वितीय), श्री शिव-शाहू महाविद्यालय, सरूडची आकांक्षा काळे (तृतीय), विवेकानंद कॉलेजची अंकिता वरुटे (तृतीय), कॉमर्स, मॅनेजमेंट आणि लॉमधून डीआरके कॉलेज ऑफ कॉमर्सची काव्या शिरगावी (प्रथम), श्री शिव-शाहू महाविद्यालय सरूडची वैष्णवी पाटील (द्वितीय), शाहू कॉलेजचा निशांत मटाले (तृतीय), प्युअर सायन्समधून दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स व कॉमर्स कॉलेज, इचलकरंजीतील सिरमन मुजावर(प्रथम), आनंदी फार्मसी कॉलेज, कळंबेतील जतीन सासने (द्वितीय), दि न्यू कॉलेजमधील विदुल जोशी (तृतीय), ॲग्रिकल्चर आणि अनिमल हजबंडरी विभागातून कमला कॉलेज येथील सीमीन बागवान (प्रथम), दि न्यू कॉलेज येथील मुनीफ अन्सारी (द्वितीय), दि न्यू कॉलेज येथील विजया जंगम (तृतीय), इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजी विभागातून दि न्यू कॉलेज येथील ऋतुजा पाटील (प्रथम), वासंतीदेवी पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीची साक्षी पाटील (द्वितीय), वारणानगर तात्यासाहेव कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग आणि टेक्नॉलॉजीची मानसी मुळीक (तृतीय) यांचा समावेश आहे.

विजेत्यांना रोख रक्कम, प्रमाणपत्र दिले. आविष्कार संशोधन स्पर्धेचे समन्वयक प्रा. यू. एस. शेळके यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. पी. पवार यांनी पारितोषिकांचे वाचन केले. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षप्रमुख डॉ. शकील शेख यांनी आभार मानले. डॉ. महेश रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्या सरोज पाटील, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य डॉ. एम. बी. शेख आदींनी भेट दिली.

सकाळ

# प्रा. राहुल माने यांची निवड



प्रा. डॉ. राहुल माने

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. राहुल माने यांची एमडीपीआय पब्लिशरच्या मटेरियल जर्नल सल्लागारपदी निवड झाली. अशी निवड होणारे ते महाराष्ट्रातून एकमेव आहेत. डॉ. माने यांचे ७५ हून अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत. त्यांचे सोलार एनर्जीवर संशोधन कार्य असून त्यांनी त्यासंबंधित सात पुस्तके प्रकाशित केली आहेत. ते ३० हून अधिक जर्नलचे परीक्षक म्हणून काम पाहत आहेत. तसेच वीसहून अधिक जर्नलच्या सदस्य, असोसिएट एडिटरपदी नियुक्त आहेत. त्यांना डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी भारत सरकारचा यंग सायंटिस्ट पुरस्कारही मिळाला आहे. जगातील पंधराहून अधिक विज्ञान सोसायटीच्या मंडळावर सदस्य आहेत. २५ हून अधिक आंतरराष्ट्रीय परिषदेच्या सल्लागार पदावर त्यांनी काम केले आहे.